सत्यमेव जयते
Government of India

Department of Skills, Employment, Entrepreneurship & Innovation (Maharashtra)

Centre for Agro Bio Innovation and Incubation Foundation (CABIIF), SRTM University Nanded

Department of Industry (Maharashtra)

Department of Electronics, IT & Artificial Intelligence (Maharashtra)

Government of Maharashtra

**District Collector Office, Nanded**

# Nanded
# Maha-Ideathon 2026

**IDEAS | INNOVATION | IMPACT**



## Seva Sankalp Abhiyan

**17th September – 17th October 2026**

An initiative under the Seva Sankalp Abhiyan to connect youth, students, startups, corporate innovators and rural problem-solvers with real-world challenges for a better Nanded and a stronger Maharashtra.

## Focus Domains

- Agricultural Tech
- Healthcare
- Education
- Environment
- Digital Governance – Public Service Delivery

### Who Can Participate?

- Students (College / University)
- Startups
- Corporate Innovators
- Rural Problem-Solvers

Team Size: 1 to 5 Members

### Important Dates

Last Date for Submission
**5 October 2026**

Technical Screening
**6 – 8 October 2026**

Jury Pitching
(Dates will be conveyed)

### For Registration

**For Students:**
Contact your college (Engineering, Polytechnic, ITI, Agricultural)

**For Non-Students:**
**CABIIF,**
Swami Ramanand Teerth Marathwada University Nanded

For any queries contact:
**+91 9764567456**
**+91 7776804220**

For guidelines and submission document visit:
**https://nanded.gov.in/en**

IDEAS | INNOVATION | IMPACT

सत्यमेव जयते
भारत सरकार

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम विभाग (महाराष्ट्र शासन)

कृषी जैव तंत्रज्ञान आणि उद्योजकता प्रोत्साहन केंद्र (CABIIF), SRTM विद्यापीठ नांदेड

उद्योग विभाग (महाराष्ट्र शासन)

इलेक्ट्रॉनिक्स, आयटी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग (महाराष्ट्र शासन)

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

# नांदेड महा-आयडियाथॉन 2026

**कल्पना | नवोन्मेष | परिणाम**



# सेवा संकल्प अभियान

**17 सप्टेंबर - 17 ऑक्टोबर 2026**

नांदेडच्या उज्वल भविष्यासाठी आणि अधिक मजबूत महाराष्ट्रासाठी युवक, विद्यार्थी, स्टार्टअप्स, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागातील समस्या निवारक यांना वास्तविक जगातील आव्हानांशी जोडण्यासाठी 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत एक उपक्रम.

## मुख्य क्षेत्रे

- कृषी तंत्रज्ञान
- आरोग्य
- शिक्षण
- पर्यावरण
- डिजिटल प्रशासन – सार्वजनिक सेवा वितरण

### कोण सहभागी होऊ शकतात?

- विद्यार्थी (महाविद्यालय / विद्यापीठ)
- स्टार्टअप
- कॉर्पोरेट नवोन्मेषक
- ग्रामीण समस्या सोडवणारे

टीम आकार:
1 ते 5 सदस्य

### महत्वाच्या तारखा

अंतिम सादरीकरणाची तारीख
**5 ऑक्टोबर 2026**

तांत्रिक स्क्रीनिंग
**6 – 8 ऑक्टोबर 2026**

ज्युरी पिचिंग
(तारीख पुढे कळविण्यात येईल)

### नोंदणीसाठी

**विद्यार्थ्यांसाठी:**
महाविद्यालयाशी संपर्क साधा (इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक, ITI, कृषी महाविद्यालये)

**अ-विद्यार्थ्यांसाठी:**
**CABIIF,**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

काही शंका असल्यास संपर्क करा:
+91 9764567456
+91 7776804220

मार्गदर्शक सूचना व सादरीकरण दस्तऐवजासाठी भेट द्या:
https://nanded.gov.in/en

**IDEAS | INNOVATION | IMPACT**

# प्रसिद्धी पत्रक (Press Note)

**‘सेवा संकल्प अभियाना’ अंतर्गत ‘नांदेड महा-आयडीयाथॉन २०२६ (Solve for Your District)’ चे भव्य आयोजन; तरुणांच्या तंत्रज्ञानाधारित संकल्पनांना मिळणार वाव**

**नांदेड:** मा. पंतप्रधान यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या सेवा पर्वाच्या औचित्याने राज्यभरात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत **'सेवा संकल्प अभियान'** राबवले जात आहे. या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातील शेती, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि डिजिटल प्रशासनातील स्थानिक आव्हानांवर कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी **'नांदेड महा-आयडीयाथॉन २०२६ (Solve for Your District)'** चे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या नवीन शासन निर्णयानुसार, जिल्हास्तरीय महा-आयडीयाथॉनमधील विजेत्या उपायांना राज्यस्तरीय **'महा-नाविन्यता आव्हान' (Maha-Grand Innovation Challenge)** मध्ये सादरीकरणाची संधी मिळून थेट **शासकीय कार्यादेश (Work Orders)** आणि इनक्युबेशन सहाय्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## आयोजक व मुख्य यंत्रणा

- **नोडल विभाग:** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन.
- **राज्यस्तरीय अंमलबजावणी संस्था:** महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS) व रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (RTMSSU), मुंबई.
- **सह-आयोजक विभाग:** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उद्योग विभाग आणि इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विभाग.
- **जिल्हास्तरीय नेतृत्व:** मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अंमलबजावणी समिती.

## सहभागाचे स्वरूप व ५ प्रमुख क्षेत्रे (Domains)

या हॅकाथॉनमध्ये जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक, स्टार्टअप्स, आयटीआय/अभियांत्रिकीचे विद्यार्थी, व्यावसायिक आणि ग्रामीण भागातील नवोन्मेषक (Rural Innovators) १ ते ५ सदस्यांच्या संघात सहभागी होऊ शकतात. सहभागींना खालील ५ प्रमुख क्षेत्रांतील स्थानिक आव्हानांवर तंत्रज्ञान व AI वर आधारित उपाय सादर करायचे आहेत:

1. **कृषी तंत्रज्ञान (AgriTech)**
2. **आरोग्य सेवा (Healthcare)**
3. **गुणवत्तापूर्ण शिक्षण (Education)**
4. **पर्यावरण, पाणी व कचरा व्यवस्थापन (Environment, Water & Waste Management)**
5. **डिजिटल गव्हर्नन्स व सेवा वितरण (Digital Governance & Service Delivery)**

## निवड प्रक्रिया, मुदत व बक्षीसे

| टप्पा | तपशील व मुदत |
|---|---|

| | |
|---|---|
| **नोंदणी व अर्ज** | **५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत** Annexure 1 मध्ये (PPT) PDF स्वरुपात संबंधित महाविद्यालयांमार्फत अर्ज सादर करणे आवश्यक.<br><br>सादरीकरण प्रसंगी 2 मिनीटांचा video , Prototype व इतर तांत्रिक बाबी सादर करणे आवश्यक. |
| **अंतिम फेरी (Grand Finale)** | प्राथमिक छाननीनंतर निवडलेल्या उत्कृष्ट संघांना मा. जिल्हाधिकारी, नांदेड व तज्ज्ञ समितीसमोर थेट सादरीकरण करण्याची संधी मिळेल. |
| **पारितोषिके व राज्यस्तरीय संधी** | सर्वोत्कृष्ट ३ विजेत्या संघांना जिल्हास्तरीय विशेष पारितोषिक देऊन गौरवले जाईल. तसेच राज्यस्तरीय **'महा-नाविन्यता आव्हान'** साठी थेट शिफारस केली जाईल . |

अर्ज सादरीकरणाचे मार्ग

- **विद्यार्थी सहभागी:** जिल्ह्यातील सर्व अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन (Polytechnic), ITI व कृषी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपले अर्ज स्वतःच्या महाविद्यालयातील **'ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल' (TPO)** किंवा **'इन्क्युबेशन सेंटर'** मार्फत जमा करावेत.
- **विद्यार्थी व्यतिरिक्त इतर सहभागी (स्टार्टअप्स, व्यावसायिक व ग्रामीण नवोन्मेषक):** आपले प्रकल्प **'सेंटर फॉर ॲग्रो बायो इनोव्हेशन अँड इनक्युबेशन फाऊडेशन' (CABIIF)**, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (SRTMU), नांदेड येथे सादर करावेत.
- नोट - Annexure 1 मध्ये केवळ PDF दाखल करावे

## अधिक माहिती, मार्गदर्शक सूचना व नावनोंदणी प्रक्रिया:

या स्पर्धेबाबतची सविस्तर माहिती, मार्गदर्शक सूचना आणि विविध क्षेत्रांतील समस्यांचे तपशील (Problem Statements) मिळवण्यासाठी इच्छुकांनी जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असणारे दस्तऐवज पहावेत. नांदेड जिल्हा अधिकृत संकेतस्थळ: **https://nanded.gov.in/en**

तसेच, गैर-विद्यार्थी प्रवर्गातील (Non-Students / व्यावसायिक / स्टार्टअप्स / ग्रामीण नवोन्मेषक) सहभागींनी आपले अर्ज व प्रकल्प सादर करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (SRTMUN), नांदेड यांच्या **https://srtmun.ac.in/** या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली नोंदणी व सबमिशन प्रक्रिया पूर्ण करावी.

अधिक माहिती व संपर्कासाठी:
अधिक माहिती करिता श्री हनुमंत रंगा +91 9764567456, +91 7776804220 यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्ह्यातील सर्व तरुण, विद्यार्थी, स्टार्टअप्स आणि संशोधकांनी या 'नांदेड महा-आयडीयाथॉन २०२६' मध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन नांदेड जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे

करण्यात येत आहे.